पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील संपादित केलेल्या जमिनींसाठी 12.5 टक्के प्रमाणे जमीन, जमीन मालकास परत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : पीडीएन-1689/228/प्र.क्र.31/नवि-22,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक 15 सप्टेंबर 1993.

वाचा : शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक : पीडीएन-1689/228/प्र.क्र.31/नवि-22.
दिनांक 3 मार्च 1990.

प्रस्तावना : शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक : पीडीएन-1689/228/प्र.क्र.31/नवि-22 दिनांक 3 मार्च 1990 अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील ज्या जमीनमालकांच्या जमिनी, प्राधिकरणाकरिता दिनांक 3/3/90 नंतर संपादित करण्यात आल्या आहेत, अशा जमीन मालकांना, संपादित केलेल्या जमिनीच्या 12.5 टक्के जमीन, विविध अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून देण्यात यावी असे आदेश निर्गमित करण्यात आले होते. हे आदेश त्या दिनांकाच्या पूर्वी संपादित केलेल्या जमिनींनाही लागू करावेत अशी प्राधिकरणाकडे जमीन मालकांनी मागणी होती. त्याकारणाने आदेशाचा फेरविचार करुन, विशेष बाब म्हणून शासन, दिनांक 3/3/1990 च्या आदेशात पुढीलप्रमाणे अंशतः फेरबदल करुन सुधारीत आदेश देत आहे.

शासन निर्णय : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकासासाठी सन 1984 पासून संपादित केलेल्या जमिनीपैकी दर एकरी 5 गुंठे किंवा संपादित क्षेत्राच्या 12.5 टक्के एवढी जमीन तिच्या मालकास प्राधिकरण पुढील अटींच्या अधीन राहून वाटप करील.

अ) ही योजना ज्या जमीन मालकांची जमीन प्राधिकरणाकरिता संपादित करण्यात आली आहे अशा जमिनीच्या बाबतीत पूर्वलक्षी प्रभावाने (म्हणजे 1 जानेवारी 1984) पासून लागू होईल.

ब) दर एकरी 5 गुंठे किंवा संपादित क्षेत्राच्या 12.5 टक्के देण्यात आलेल्या जमिनीवरील विकासाची कामे (रस्ते, पाणी, वीज, गटारे इत्यादी नागरी सुविधा) पिंपरी चिंचवड महानगरपालिका करेल व त्यासाठी लागणारी जमीन प्राधिकरण उपलब्ध करुन देईल.

क) जमीन मालकांना परत करावयाची 12.5 टक्के अविकसित जमीन प्राधिकरण शक्य असल्यास ज्या गांवातील जमीन संपादित केली असेल तेथे देईल. त्या गावात तेवढी जमीन उपलब्ध नसेल तर दुस-या गांवात जमीन मालकांच्या संमतीने उपलब्धतेनुसार वितरीत करील.

ड) प्रति एकरी 5 गुंठे किंवा संपादित क्षेत्राच्या 12.5 टक्के जमिनीचा मोबदला, ज्या शेतक-यांनी पूर्वीच घेतला आहे, त्यांना या आदेशानुसार तेवढी जमीन वितरीत करण्यापूर्वी त्यांनी घेतलेल्या 12.5 टक्के जमिनीची मोबदला रक्कम व्याज, (द.सा.द.शे. 12.5 टक्के ज्या तारखेपासून मोबदला घेतला असेल त्या तारखेपासून अशा 12.5 टक्के जमिनीचा ताबा घेणेचे तारखेपर्यंतच्या मुदतीसाठीत) प्राधिकरणाला परत करावी लागेल.

इ) ज्या शेतक-यांना शासन निर्णयाचा फायदा घ्यावयाचा असेल त्यांना न्यायालयात दाखल केलेल्या सर्व प्रकारच्या याचिका/प्रकरणे बिनाशर्त परत मागे घ्यावी लागतील.

फ) प्राधिकरणाने या आदेशान्वये जमीन मालकांना परत दिलेली जमीन दुस-या व्यक्तीस प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने, कोणत्याही प्रकारची रक्कम प्राधिकरणास न देता, हस्तांतरीत करता येईल. परंतु अशा दुस-या व्यक्तीस ती जमीन त्यापुढे प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय व नियमानुसार अनर्जित रकमेचा विहित भाग प्राधिकरणास दिल्याशिवाय हस्तांतरीत करता येणार नाही.

तसेच या आदेशान्वये वाटप करण्यात येणा-या जमिनीस नागरी जमीन (कमाल धारणा व नियमन) 1976, अधिनियमातील तरतुदी लागू राहतील.

८) अशा सर्व जमिनीवर पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नियोजनासाठी नियंत्रण राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दा. पु. [illegible] )

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे सचिव, मुंबई.

मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

सर्व मंत्री.

सर्व राज्यमंत्री.

Source: Government of Maharashtra Official Website